# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 21 January 2026
## Time 01.00 to 01.05 PM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक २१ जानेवारी २०२६ दुपारी १.०० वा.

****

बूथ स्तरावरील अधिकारी हे देशातल्या निवडणूक आधारित लोकशाहीचा पाया असल्याचं, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत भारत निवडणूक आयोगाच्या वतीनं आयोजित आंतरराष्ट्रीय लोकशाही आणि निवडणूक व्यवस्थापन परिषदेत ते आज बोलत होते. भारत ही लोकशाहीची जननी आहे आणि प्रत्येक पात्र मतदाराचा समावेश करून अचूक मतदार याद्या राखणं हे लोकशाही बळकट करण्यासाठी आवश्यक असल्याचं त्यांनी नमूद केलं. या परिषदेसाठी ३२ देशांमधले सुमारे ७१ प्रतिनिधी नवी दिल्लीमध्ये दाखल झाले आहेत. लोकशाही, निवडणूक व्यवस्थापन, आंतरराष्ट्रीय निवडणूक मानके, तसंच निवडणूक प्रक्रियेतल्या नवकल्पना आणि उत्तम पद्धती यावर या परिषदेत सखोल चर्चा होणार आहे. या परिषदेमुळे लोकशाहीच्या भवितव्यावर आणि निवडणूक प्रशासनावर जागतिक पातळीवरील उच्चस्तरीय संवादाला नवी दिशा मिळणार असल्याचं भारत निवडणूक आयोगाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवलं आहे.

****

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आज संपत आहे. उद्या २२ तारखेला अर्जांची छाननी होईल तर, २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. त्याच दिवशी अंतिम उमेदवार यादी आणि चिन्ह वाटप करण्यात येईल. पाच फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. प्रत्येक मतदाराला जिल्हा परिषदेसाठी एक आणि पंचायत समितीसाठी एक अशी दोन मतं द्यावी लागणार आहेत.

****

स्वित्झर्लंडमध्ये दावोस इथं जागतिक आर्थिक मंचाच्या वार्षिक बैठकीच्या कालच्या दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत तिसऱ्या मुंबईतलं पहिलं शहर म्हणून रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा करण्यात आली. नवी मुंबई विमानतळापासून पंधरा ते वीस किलोमीटरवर हे ग्रोथ सेंटर निर्माण करण्यात येणार आहे.
दावोस दौरा हा भारतात आणि पर्यायाने महाराष्ट्रात ज्ञान, तंत्रज्ञान आणि विदेशी गुंतवणूक मिळवण्यासाठीचा महत्वाचा प्रयत्न असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. यंदा नागरी क्षेत्रातील नियोजन आणि परिवहन व्यवस्थेच्या दृष्टीने या क्षेत्रातल्या दिग्गज कंपन्याशी संवाद, समन्वय साधता आल्याचं त्यांनी सांगितलं.

****

भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांनी २७ वर्षांच्या दीर्घ आणि गौरवशाली सेवेनंतर नासातून निवृत्ती घेतली आहे. नासानं एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे विल्यम्स यांची निवृत्ती जाहीर केली. सुनिता विल्यम्स या आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या तीन अभियानात सहभागी झाल्या होत्या, त्यांनी अंतराळात ६०८ दिवस घालवले असून, हा नासाच्या अंतराळवीराचा अंतराळात घालवलेला दुसरा सर्वाधिक काळ आहे. त्यांनी ६२ तासांचा स्पेस वॉक पूर्ण केला असून, अंतराळात मॅरेथॉन धावणार्या त्या पहिल्या अंतराळवीर आहेत. गेल्या वर्षी बोइंग स्टारलाइनर आणि स्पेसएक्स क्रू-नाईन या त्यांनी पार पाडलेल्या सगळ्यात कठिण आणि आव्हानत्मक मोहिमा होत्या. या मोहिमेत त्या आठ महिन्यांपेक्षा अधिक काळ अंतराळात अडकून राहिल्या होत्या. विल्यम्स यांचं कार्य येणार्या पिढ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचं नासानं म्हटलं आहे.

****

आगामी विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपने काही महत्त्वाच्या संघटनात्मक नियुक्त्या केल्या आहेत. पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांची केरळ प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, शोभा करंदलाजे या सहप्रभारी म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत. याशिवाय, चंदीगड महापौर निवडणुकीसाठी विनोद तावडे सहप्रभारी म्हणूनही काम पाहणार आहेत. त्याचबरोबर राज्याचे मंत्री आशिष शेलार यांच्यावर तेलंगणातल्या पक्षप्रभाराची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

****

आंतरमहासागरीय नौकानयन मोहिमेसाठी आयएनएस सुदर्शनीला काल केरळमधल्या कोची इथून रवाना करण्यात आलं. या मोहिमेला व्हाईस ॲडमिरल समीर सक्सेना यांच्या हस्ते औपचारिक हिरवा झेंडा दाखवण्यात आला. ही नौकानयन मोहीम तब्बल २२ हजार सागरी मैलांचा प्रवास करणार असून, १३ देशांतल्या १८ प्रमुख बंदरांना भेट देणार आहे.

****

पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग मंत्री पंकजा मुंडे यांनी नवी दिल्लीत केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांची भेट घेऊन राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाच्या प्रस्तावाचं सादरीकरण केलं. या प्राधिकरणाला मंजुरी मिळाल्यास ते देशातलं पहिलं राज्यस्तरीय नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण ठरेल, अशी माहिती मुंडे यांनी दिली. या भेटीत राज्यातल्या जलसंधारण आणि पर्यावरणाशी संबंधित प्रकल्पांच्या सद्य:स्थितीवर सविस्तर चर्चा झाली. नद्यांच्या स्वच्छतेसाठी केंद्र सरकारच्या योजनांसोबतच राज्याची स्वतंत्र यंत्रणा आणि सुनियोजित धोरण असणं आवश्यक असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. विविध राज्यांतून वाहणाऱ्या नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी स्थानिक पातळीवर प्रभावी उपाययोजना राबवल्यास नद्यांचं प्रदूषणमुक्तीचं उद्दिष्ट साध्य होऊ शकेल, असा विश्वासही मुंडे यांनी व्यक्त केला.

****

सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हिने नंदुरबार जिल्ह्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाअंतर्गत असलेल्या तीन गावांना भेट देवून तिथल्या विकास योजनांची माहीती घेतली. नंदुरबार सारख्या आदिवासी बहुल भागात आदिवासी संस्कृती जोपासत गावपातळीवर ग्रामस्थांनी विकासाची धरलेली कास वाखाणण्याजोगी असल्याचं मत सोनालीने यावेळी व्यक्त केलं.

****